# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित...




















## असा रंगला स्त्रीरत्न - २०२५ पुरस्कार सोहळा..!

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित...






















## असा रंगला स्त्रीरत्न - २०२५ पुरस्कार सोहळा..!

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित...























## असा रंगला स्त्रीरत्न - २०२५ पुरस्कार सोहळा..!

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित...




















## असा रंगला स्त्रीरत्न – २०२५ पुरस्कार सोहळा..!

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित...




















## असा रंगला स्त्रीरत्न - २०२५ पुरस्कार सोहळा..!

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित...




















## असा रंगला स्त्रीरत्न - २०२५ पुरस्कार सोहळा..!

# पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने कर्तबगार महिलांचा शानदार गुणगौरव सोहळा संपन्न

## शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन महिलांनी सक्षम व्हावे - निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी

## स्त्रीला संपत्तीपेक्षा सन्मान महत्त्वाचा - सौ. प्राजक्ताताई धस







### या कर्तबगार महिलांचा झाला सन्मान...

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रीरत्न पुरस्कार - २०२५ देऊन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने प्रमुख आकर्षण असलेल्या सौ. प्राजक्ताताई सुरेश धस, श्रीमती निर्मलाताई खटोड, केज नगरीच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड, डॉ. सौ. मीराताई ढाकणे, सौ.चंपावती काकी पानसंबळ, श्रीमती अनिताताई वाघमारे, रूपाली देशपांडे, सौ.जयश्रीताई विधाते, श्रीमती द्वारका कांबळे, सौ.दैवशाला शिरसट, सौ. रुक्मिणी नवनाथ शिराळे, सौ.प्रतिभा शिनगारे, मसरत सुलताना, उम्मेहनी शेख, अरुणा हम्प्रस, मेधा गोसावी आदी महिलांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ, हार,गुलाबाचे झाड देऊन कुटुंबीयांसह मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.

बीड ।प्रतिनिधी

स्त्रियांनी सक्षम व्हावे अशी भूमिका शासन आणि प्रशासनाची आहे.प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटवावा. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन महिलांनी स्वत:साठी नवे मार्ग शोधले पाहिजेत असे आवाहन निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले. तर स्त्रीला संपत्तीपेक्षा सन्मान अधिक महत्त्वाचा आहे. परिस्थिती एका दिवसात बदलत नाही, परंतु महिलांनी पुढे येऊन संघर्ष करणे आवश्यक आहे. समाजाचा दृष्टिकोन बदलला तरच खऱ्या अर्थाने समानता प्रस्थापित होईल असे मत सौ. प्राजक्ता सुरेश धस यांनी व्यक्त केले.

बीड येथील हॉटेल नीलकमल येथे जागतिक महिला दिनी शनिवार दिनांक ८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्त्रीरत्न पुरस्कार सोहळा २०२५ चे शानदार वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार ॲड.उषाताई दराडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, बीडचे गटशिक्षणाधिकारी खान समंदर हमीद खान, ज्येष्ठ महिला उद्योजक निर्मलाताई खटोड, केज नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड, केज जनविकास आघाडीचे प्रमुख हारूण भाई इनामदार, प्रसिद्ध उद्योजक गौतम शेठ खटोड, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सानप, पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलाने आणि अनिता वाघमारे यांनी स्त्री शक्तीवर सुंदर रचना तयार करून गायलेल्या स्वागत गीताने झाली.

### महिलांनी स्वत:ची ओळख निर्माण करावी - नगराध्यक्षा सीताताई बनसोड

स्त्रीला शिक्षणाचा आणि स्वत:च्या अस्तित्वाचा पूर्ण अधिकार आहे. संविधानाने दिलेल्या संधींचा उपयोग करून महिलांनी स्वत:ची ओळख निर्माण करावी. गर्भाशय हा स्त्रीसाठी अनमोल दागिना आहे, त्यामुळे कोणत्याही न्यूनगंडाशिवाय महिलांनी आत्मविश्वासाने उभे राहायला हवे. असे परखड मत व्यक्त करत केज नगरपंचायतच्या विद्यमान नगराध्यक्ष सीताताई बनसोड यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा जीवनपट मनोगतात व्यक्त केला.

### बीड जिल्ह्यात स्त्री जन्मदर वाढला पाहिजे - डॉ. अशोक थोरात

बीड जिल्हा पूर्वी स्त्रीभ्रूणहत्येसाठी कुप्रसिद्ध होता, मात्र आता जन्मदर सुधारत आहे मात्र तो अजून वाढला पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मुलींचा जन्मदर वाढला पाहिजे यासाठी जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबवण्यात येतात.माझा येणाऱ्या १४ मार्च रोजी वाढदिवस आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी कोणीही पुष्पगुच्छ अथवा इतर साहित्य न आणता तेवढ्याच रकमेची साडी भेट म्हणून द्यावी. त्या साडीनेच जिल्हा रुग्णालयामध्ये ज्या मातेने मुलींना जन्म दिला त्या मातेला साडी चोळी भेट देऊन सन्मान करण्यात येईल. असे आवाहन करून ते म्हणाले, स्त्रियांना आरोग्याच्या सुविधा पुरवण्यासाठी आरोग्य प्रशासन कटिबद्ध आहे.

### स्त्रिया या आयुष्यातील खऱ्या अभिनेत्री आहेत - माजी आ. ॲड. उषाताई दराडे

पडद्यावरच्या अभिनेत्री असल्या तरी सुद्धा आयुष्य जगत असताना खऱ्या अर्थाने आमच्यासारख्या सामान्य स्त्रिया या आयुष्यातील खऱ्या अभिनेत्री आहेत. त्यांचे मन ओळखणे कठीण असते. मात्र, त्यांच्या भावना समजून घेणे महत्त्वाचे आहे. फक्त महिला दिनाच्या दिवशी नव्हे, तर वर्षभर स्त्रियांना सन्मान मिळायला हवा.

संकटांना घाबरून न जाता खंबीरपणे सामोरे जाण्याची ताकद महिलांमध्ये आहे. असे मत व्यक्त करत त्यांनी देखील मी कसे घडले यावर आपल्या बालपणापासून ते राजकीय प्रवासापर्यंत सविस्तर मन मनमोकळे केले.

# घरकुल योजनेत कसलाही गैरप्रकार होता कामा नये आ.संदीप क्षीरसागरांकडून प्रशासनाला कडक निर्देश

बीड (प्रतिनिधी):- सध्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना यांसह शासनाच्या विविध घरकुल योजनेची कामे प्रशासकीय स्तरावर सुरु आहेत. या योजनेतील लाभार्थी हे गरजू आणि वंचित असतात. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्यास कसल्याही प्रकारचा अडथळा होऊ नये, तसेच या योजनांच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर आर्थिक मागणी अथवा इतर कसलाही गैरप्रकार होऊ नये याची पुरेपूर दक्षता घ्या. तसेच पात्र लाभार्थींना तातडीने घरकुल हप्ता वितरीत करा, असे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिका, बीड पंचायत समिती व शिरूर कासार पंचायत समिती व बीड नगरपालिका येथील अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सध्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर सध्या प्रस्ताव दाखल करून घेणे सुरू आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरीचे ऑनलाईन अर्ज दाखल करून घेण्याची प्रक्रिया झाली आहे. रमाई आवास योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावरून दाखल करवून घेऊन पंचायत समितीमार्फत समाजकल्याण विभागाकडे दाखल करण्यात आले आहेत तसेच त्रुटी असलेले प्रस्तावांची पुर्तता करणे सुरू आहे.

बऱ्याचवेळा या योजनेतील लाभार्थ्यांकडून अधिकारी आर्थिक मागणी करत असल्याच्या तक्रारी येत असतात. जे नागरिक या योजनेचे लाभार्थी आहेत ते सर्व अतिसर्वसामान्य, गरीब आणि वंचित घटकातील असतात. त्यांची अडवणूक करणे, आर्थिक मागणी करणे किंवा इतर कोणत्याही



प्रकारचा गैरप्रकार या योजनेच्या कार्यवाहीत होता कामा नये. तसेच जे लाभार्थी पात्र आहेत त्यांचे हप्ते तातडीने वितरीत करा अशाप्रकारचे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तालुक्याचे गटविकास अधिकारी, बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

बोगसगिरी आणि लाभार्थ्यांची पिळवणूक अजिबात खपवून घेणार नाहीदरम्यान, घरकूल योजनेचा लाभ घेऊन घर न बांधताच अधिकार्यांच्या संगनमताने रक्कम उचलल्याचे गैरप्रकार जिल्ह्यात समोर आले आहेत. असले प्रकार बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात अजिबात खपवून घेणार नाही. त्यासोबतच लाभार्थ्यांची अधिकार्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूकही सहन केली जाणार नाही. अशी तंबीही आ.संदीप क्षीरसागरांनी अधिकार्यांना दिली आहे.

बीड तालुक्याने विशेष लक्ष देण्याची गरज, दिरंगाई चालणार नाही

घरकुलाचा पहिला हप्ता सोडविण्यात बीड तालुका मागे पडला आहे. बीड पंचायत समिती अंतर्गत एकूण २९२९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे बीड पंचायत समितीने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीत दिरंगाई चालणार नाही. यासोबतच घरकूल संदर्भात बीड नगरपालिकेच्याही अनेक तक्रारी नागरिकांमधून होत आहेत.

## पतंजली प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल

नागपूर : पतंजली फुड व हर्बल पार्कच्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करून तो बाजारपेठेत जाणार आहे. संत्र्याची ग्रेडींग, साठवणही येथे होणार असून हा प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. या प्रकल्पास राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून पतंजली व राज्यशासन संयुक्तपणे सर्व सोयींनी सज्ज नर्सरी येथे उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले. येथील मिहान परिसरात स्थित पतंजली फुड आणि हर्बल पार्कचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. योगगुरु स्वामी रामदेव बाबा, पतंजली आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण, कृषी राज्यमंत्री ड. आशिष जलस्वाल, आमदार सर्वश्री डॉ. आशिष देशमुख, समीर मेघे आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ९ वर्षापूर्वी मिहानमध्ये पतंजलीने पाया रचला. त्यानंतर बऱ्याच अडचणी आल्या तरीही नडगमगता त्यांनी हा प्रकल्प पुर्णत्वास नेला. पतंजली उद्योग समुहाला नागपुरात मिहानमध्ये आमंत्रित केले त्याचवेळी विविध राज्यातून या समुहाला त्या-त्या राज्यांमध्ये उद्योग उभारण्यास बोलावण्यात येऊ लागले.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित...





